# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/09/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :-** अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मोरारजी कंपनी येथे दिनांक २६/०९/२०२३ ते २७/०९/२०२३ चे ११/०० वा. ते ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- शुभम होमराज लाकडे वय २९ वर्ष रा टेंभरी हा मोररजी कंपनी येथे सिक्यूरीटी इंचार्ज म्हणुन काम पाहतो फिर्यादी हा स्टोर रूम कडे गेले असता खिडकीचे काच फुटलेले दिसले असल्याने मोरारजी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांना माहीती दिली व स्टोअरचे रूम मधील सामान अस्ताव्यस्त दिसले मालाची पाहणी केली असता 1) Dietz Motoren 380V मोटार प्रत्येकी १५०००/- रू चे ४ नग एकुण ६०,०००/- रू 2) Dietz Motoren 380V 400 V मोटार चे ४ नग प्रत्येकी २००००/- रू एकुण ८०,०००/- रू ३) एक २.२ व्हि मोटार कि १८,०००/- रू असा एकुण १,५८,०००/- रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/३७७ पांडे मोबाईल क्र ८८८८८३८९९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद :-** अंतर्गत १२ कि.मी अंतरावरील परसोडी येथे दिनांक २६/०९/२०२३ चे २०.३० वा. ते २३.५९ वा. दरम्यान फिर्यादी नामे- अनूप प्रकाश महंत, वय ४७ वर्ष रा. परसोडी ही आपल्या घरी घराच्या बाहेर वरांडयात झोपली असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घरात आत प्रवेश करून कपाटातील १) ३ ग्रॅम कानातील सोन्याच्या बिऱ्या किंमती ५,०००/-रू २) २ ग्रॅम सोन्याची अंगठी किंमती ३,०००/- रू ३) व नगदी ४०,०००/- रू असा एकूण ४८,०००/- रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुधीर यादगिरे मो. नं. ८८८८६५८७१३ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. बेला :—** अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा बेला टाउन येथे दिनांक २६/०९/२०२३ चे ११/०० वा. ते १३/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अखिल पंढरीनाथ डफरे, वय ३२ वर्ष, रा. वरूड ता. जि. वर्धा ह. मु. मुन गुरूजी राहते घरी वार्ड नं. ०६ बेला ता. उमरेड जि. नागपुर याचे मेडीकलचे दुकान असुन गुजरी चौक येथे मॉ भवानी मेडीकल स्टोर चालवितो. सकाळी १०/०० वा. मेडीकलचे दुकाण उघडतो व रात्री १०/०० वा. बंद करतो. घरी फिर्यादी व त्याची पत्नी व वडिल राहतात. दिनांक २६/०९/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. दरम्यान फिर्यादी दुकान उघडुन बसले असता ०९/०० वा. दरम्यान फिर्यादीचे वडिल आले त्यांनतर ११/०० वाजता फिर्यादीची पत्नी हि जेवनाचा डब्बा घेवुन मेडीकलच्या दुकाणात आली तिघेही दुकाणात हजर असतांना फिर्यादीचे वडिल दुकाणातुन ०१/३० वा. दुपारी घरी गेले असता त्यांना घराचे दार उघडे दिसले व कुलुप तुटले दिसले घराच्या आत जावुन बघीतले असता कपाटाचा दरवाजा उघडा दिसला तेव्हा फिर्यादीला स्वतः दुकाणात येवुन सांगीतले कि, ‘‘तु दुरवाजा उघडा ठेवला होता का?’’ तेव्हा फिर्यादीने वडिलांना नाही म्हटले तेव्हा फिर्यादी व त्याचे वडिल घरी येवुन कपाटातील ठेवलेले पैसे बघितले असता कपाटामधील पैसे चोरीस गेलेले दिसले कपाटामध्ये ठेवलेले १५००/—रूपये फिर्यादीच्या घरी जावुन कोणीतरी अज्ञात ईसमाने घराच्या दरवाज्याचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून कपाटामधील ठेवलेले १५००/— रूपये चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनिल आदमने पो.स्टे. बेला मो. नं. ९८९०३२१९४० हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा :—** दिनांक १५/०९/२०२३ चे रात्री ११.०० वा. ते दिनांक १८/०९/२०२३ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हिचे सोबत आरोपी क्र. ०१) नामे— १) राजेन्द्र बाबुलाल कोरी, वय ३४ वर्ष रा. सतना गाव रेरूवा जि. सतना याने फेसबुकवर मैत्री करून घटना तारखेला फिर्यादिचे आयडीवर दोन अश्लिल फोटो टाकुन व्हायरल करून बदनामी केली तसेच आरोपी क्र. २) गंगाधर नागमोते रा. जलालखेडा याने फिर्यादि हिचे फोटो फिर्यादिला पाठवून गावात वायरल करून बदनामी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४ (ड), ५०० भादवी सहकलम ६६ (ई), ६७ माहीती तंत्रज्ञान कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**